




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक ११९ वा ■ ■ अमरावती, सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २५ मार्गशिर्ष १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■







## एकट्या विदर्भात ५ लाख कोटींची गुंतवणूक, इतिहासातील सर्वात मोठी भरती; मिहानमध्ये आयटी क्षेत्रातले बिग ६ : मुख्यमंत्री

नागपूर दि. १४ : १५ लाख ७२ हजार कोटींपैकी ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक एकट्या विदर्भात करण्यात आली आहे. सामंजस्य करार नुसतेच होत नाही तर अमलात देखील आणले जातात. देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ३१ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. विदर्भाच्या विकासाचा आणि गुंतवणुकीचा विचार केला तर गडचिरोली गुंतवणुकीचं नवं मॅग्नेट तयार होतंय. गडचिरोलीत आता सर्वाधिक गुंतवणूक होते असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



हिवाळी अधिवेशनातील अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रासह विदर्भ मराठवाड्यातील गुंतवणुकीबाबत माहिती देताना सांगितलं कि, मिहानमध्ये ३१ कंपनी कार्यरत आहे. तर आणखी २२ कंपनी सुरु होत आहे. आणि मिहान हे देशातलं असं केंद्र झालं आहे कि आयटीच्या क्षेत्रातले जे बिग सिक्स आहेत ते सगळेच्या सगळे त्या ठिकाणी आहे. त्यामुळे मोठ्या रोजगाराच्या संधी त्यातून निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितल.

सोलर मॉडेलमध्ये विदर्भ देशात एक क्रमांकावर होणार

अवकाश आणि संरक्षण साहित्य निर्मिती यामध्ये २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. त्यातून १५ ते २० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. सोलर मॉडेलमध्ये विदर्भ देशात एक क्रमांकावर होणार आहे. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीमध्ये छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाड्यात ५० हजार कोटीची गुंतवणूक आली आहे. त्यातून आता ५०-६० हजार रोजगार निर्माण होणार आहे. नागपूरच्या मिहानमध्ये रोजगार आला नाही असं बऱ्याचं जणांचा समज आहे. मात्र मला सांगितलं पाहिजे कि मिहानमध्ये ३१ कंपनी कार्यरत आहे. तर आणखी २२ कंपनी सुरु होत आहे. आणि मिहान हे देशातलं असं केंद्र झालं आहे (पान २ वर)

### राष्ट्रगीताने विधानसभेचे कामकाज संस्थगित पुढील अधिवेशन २३ फेब्रुवारीला मुंबईत

नागपूर, दि. १४ : विधिमंडळाचे नागपूर येथील हिवाळी अधिवेशन राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आले. पुढील अधिवेशन सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे होणार असल्याची घोषणा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत केली.

## टीम इंडियाचा तिसऱ्या टी २० मध्ये दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय




धर्मशाला दि. १४ : भारतानं तिसऱ्या टी २० मॅचमध्ये दक्षिण आफ्रिकेला विकेटनं पराभूत केलं आहे. भारताच्या गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेला ११७ धावांवर रोखलं. अर्शदीप सिंग, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे यांनी दमदार गोलंदाजी केली. एडन मारक्रम यानं ६१ धावा केल्या. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल या दोघांनी भारताला चांगली सुरुवात करुन दिली. तिसऱ्या टी २० मधील विजयासह भारतानं मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. भारतानं दक्षिण आफ्रिकेला ७ विकेटनं पराभूत केलं.

अभिषेक शर्मा आणि शुभमन गिलनं अर्धशतकी भागीदारी करत भारताला चांगली सुरुवात करुन दिली. भारताच्या ६० धावा झाल्या असताना अभिषेक शर्मा ३५ धावांवर बाद झाला. पहिल्या दोन सामन्यांमध्ये मोठी धावसंख्या करण्यात अपयशी ठरलेल्या शुभमन गिलला या मॅचमध्ये फॉर्म गवसला. शुभमन गिलनं २८ धावा करुन बाद झाला. कॅप्टन सूर्यकमार यादव १२ धावा करुन बाद झाला. तिलक वर्मानं २६ (उर्वरित पान २ वर)

## भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नितीन नबीन

नवी दिल्ली दि. १४ : भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक पातळीवर मोठा निर्णय घेत बिहार सरकारमधील मंत्री नितीन नबीन यांची पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती १४ डिसेंबर २०२५ पासून तात्काळ लागू झाली असून, बिहारसह राष्ट्रीय राजकारणात भाजपची रणनीती अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.



या नियुक्तीबाबत भाजपकडून अधिकृत संघटनात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. भाजपचे राष्ट्रीय महासचिव व मुख्यालय प्रभारी अरुण सिंह यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, ही नियुक्ती भाजपच्या संसदीय बोर्डाने केली आहे. आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे की, सध्या बिहार सरकारमध्ये मंत्री असलेले नितीन नबीन आता राष्ट्रीय स्तरावर संघटनेची महत्त्वाची जबाबदारी सांभाळतील. (पान २ वर)

## ऑस्ट्रेलियात अंधाधुंद गोळीबार, १२ जणांचा मृत्यू

सिडनी दि १४ : ऑस्ट्रेलियाच्या सिडनी शहरात गोळीबाराची घटना घडली आहे. या गोळीबारामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. तसेच ही गोळीबाराची घटना जगभरात पसरली आहे. सिडनी शहरात ज्यूंच्या उत्सवादरम्यान ही गोळीबाराची घटना घडली आहे. या गोळीबाराच्या घटनेत आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे या गोळीबाराच्या घटनेत इंग्लंडचा माजी क्रिकेटर माइकल वॉन हा थोडक्यात बचावला आहे. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान एंथनी अल्बनीजी हे या गोळीबाराच्या घटनेने आश्चर्यात पडले आहेत. अशी घटना घडूच कशी शकते? असा प्रश्न (पान २ वर)

## फुटबॉलचा देव वानखेडे स्टेडियममध्ये, लियोनेल मेस्सी याच्या हस्ते प्रोजेक्ट महादेवाचे उद्घाटन

मुंबई दि. १४ : अर्जेंटिनाला आपल्या नेतृत्वात वर्ल्ड कप जिंकून देणारा दिग्गज आणि स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी हा ३ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहे. मेस्सीने भारत दौऱ्याची सुरुवात कोलकातातून केली. मेस्सीने कोलकातात आपल्या पुतळ्याचं व्हर्च्युअल उद्धाटन केलं. त्यानंतर आता मेस्सी भारत दौऱ्यातील दुसऱ्या दिवशी मुंबई दौऱ्यावर आहे.



मेस्सीचं मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये चाहत्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आलं आहे. मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी फुटबॉल चाहत्यांनी स्टेडियममध्ये आणि (उर्वरित पान २ वर)


### माहोल....




तर्री पोहा, संत्रा बर्फी, सावजी मटण यावरून मस्त ताव मारून मज्जा मस्ती करून आपण निघालो आपल्या गावी...

## मनपा निवडणुकीत महायुती होण्यावर शिक्कामोर्तब होताच शिंदेंच्या शिवसेनेने आता नवे अस्त्र उपसले; भाजपला खिंडीत पकडणार

मुंबई दि. १४ : नगरपंचायत आणि नगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि



शिवसेना यांच्यामध्ये कमालीचा दुरावा निर्माण झाला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीला धडक देत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत महाराष्ट्र भाजपच्या तक्रारी केल्या होत्या. मात्र, आता दोन्ही पक्षांनी सबुराचा निर्णय घेत महानगरपालिका निवडणूक महायुती म्हणून लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महायुती होणार हे जवळपास निश्चित झालं असलं तरी आता जागा वाटपावरून पुन्हा एकदा शिंदे आणि भाजपमध्ये सामना रंगण्याची चिन्हे आहेत. महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप शिंदे सेनेला अधिक जागा देण्यासाठी तयार होणार का? हाच मोठा प्रश्न असेल. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर शिंदेंकडून ५०-५० चा फार्म्युला राहणार आहे.

**एमएमआरमध्येही तोच फार्म्युला राहणार**

एमएमआरमध्ये जागा वाटपासाठी याच फॉर्म्युलानुसार चर्चा होण्यासाठी शिवसेना आग्रही असेल. त्यामुळे एकंदरीतच महायुतीचा निर्णय झाला असला तरी जागा वाटपावरून जागा वाटपावरून शिवसेनेनं आक्रमक पवित्रा घेतला आहे. ज्या ठिकाणी धनुष्यबाण चिन्हावर नगरसेवक निवडून आले आहेत त्या जागांसाठी शिवसेना आग्रही राहणार आहे. याच फॉर्म्युलानुसार मुंबई महानगरमध्ये जागावाटप करण्यावर शिवसेना आग्रही असेल. या विभागात शिवसेनेची ताकद जास्त असल्याने शिवसेना अधिक जागांसाठी आग्रह राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे जागावाटपावरून भाजप आणि शिवसेनेमध्ये संघर्ष होण्याची चिन्हे आहेत.


**महायुतीच्या जागावाटपाचा मुहूर्त ठरला**

दुसरीकडे जागा वाटपाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी व महायुतीचा मुहूर्त सुद्धा ठरल्याची माहिती आहे. मुंबईच्या जागांसाठी पुढील दोन (पान २ वर)











## ट्रॅव्हल्स अंगावरून गेल्याने चालकाचा मृत्यू

### चार महिला पर्यटक जखमी; चिखलदरा रस्त्यावरील आडनदी उतारावरील घटना

अमरावती, दि. १४ : चंद्रपूरवरून पर्यटनासाठी आलेल्या महिला प्रवाश्यांची टेम्पो ट्रव्हर्स उभी असतांना उतारावरून खाली घसरली.तिला समोर जावून रोखण्याच्या प्रयत्न करणाऱ्या चालकाचा ट्रव्हर्स अंगावरून गेल्याने जागीच मृत्यू झाला तर ट्रव्हर्स मध्ये बसलेल्या चार महिला पर्यटक किरकोळ जखमी झाल्या. रविवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास चिखलदरा घाटातील आडनदी उतारावर ही घटना घडली. सुमित बनकर (३५, रा.चंद्रपूर) असे मृतकाचे नाव आहे.



या बाबत मिळालेल्या माहितीनुसार, आज रविवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास मिनी ट्रॅवलर्स क्र. डिडी ०३ - टी ९०४८ ही २२ महिला पर्यटक प्रवासी घेऊन चिखलदरा कडून चंद्रपूर कडे जात असताना ग्राम आडनदी जवळ उतारा मध्ये थांबली. दरम्यान तेथे ट्रॅव्हर्स मधून १७ ते १८ महिला आणि चालक खाली उतरले असता ट्रॅव्हर्स अचानक उतारात समोर जायला लागली त्यामुळे ड्रायव्हरने ट्रॅव्हल्स समोर येऊन ट्रॅव्हल्स थांबवण्याचा प्रयत्न केला असता ट्रॅव्हल्स सरळ चालकाच्या अंगावरून गेल्याने चालक सुमित बनकर याचा जागीच मृत्यू झाला. तसेच ट्रॅव्हल्स मधील ०४ महिला प्रर्यटक वैशाली चहांदे, वैशाली दुधगवळी, मधू पांडे, जयश्री उंदीरवाले रा. चंद्रपूर या किरकोळ जखमी झाल्या.

या घटनेची माहिती मिळताच चिखलदरा पोलीसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून चालकाचा मृतदेह उपजिल्हा (उर्वरित पान २ वर)